# नगर परिषद, अंबाजोगाई

दूरध्वनी क्र. (०२४४६)२४७०३२, ई मेल : - coambajogai@gmail.com

वेबसाईट : - ambajogaimahaulb.maharashtra.gov.in


**जा.क्र.अंनप/लोसेहअधि/२०२५/२०४४** **दि.२८/०२/२०२५**

वाचा

**संदर्भ :-** १. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०१५/प्रक्र.१८९/नवी-१४ दिनांक - २३/०६/२०१५.

२. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि/२० दिनांक - ०४/०९/२०१७

३. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि/२० दिनांक : २६/०८/२०१९

४. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचेकडील पत्र क्र.२०२५/महसूल/सेतू/**RTS**-२०१५/कावि दिनांक : २१/०२/२०२५

## - जाहीर प्रगटन -

आदेश

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत **Ease of Doing Bussiness (EoDB)** च्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ व ३ नुसार मालमत्ता, पाणी पुरवठा, ना हरकत प्रमाणपत्र, व्यापार परवाने, जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी, बांधकाम परवाने, अग्निशमन सेवा, अशा एकूण ४५ सेवा आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन व १० सेवा ऑफलाईन पध्दतीने नगर परिषदांसाठी अधिसुचित करण्यात आलेल्या आहेत.

तरी याद्वारे सर्व संबंधीत विभाग प्रमुख यांना आदेशित करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने आपले विभागाशी संबंधित लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ मधील खालील अधिसूचित केलेल्या सेवा नागरिकांना केवळ ऑनलाईन पध्दतीने देण्याबाबतची कार्यवाही करावी.

### - मालमत्ता कर -

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नव्याने कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज २) भोगवटा प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | पु:न कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | कराची मागणीपत्र तयार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | करमाफी मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | मालमत्ता कर उतारा देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ इतर मार्गाने | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला ३.मालकी हक्काची कागदपत्रे/ नोंदीकृत खरेदीखत | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | स्वयंमुल्यांकन | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | आक्षेप नोंदविणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | उपविभागाकडे मालमत्ता विभाजन | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला ३.मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत वाटणीपत्र बक्षिसपत्र ई.) | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | मालपत्ता पाडणे व पुन:बांधणी आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कर निरीक्षक | **उप-मुख्याधिकारी/** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |

### - पाणी पुरवठा -

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन नळ जोडणी | १.विहित नमुन्यातील अर्ज २.मालकी हक्क कागदपत्रे, ३) थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| २ | मालकी हक्कात बदल करणे | १.विहित नमुन्यातील अर्ज २.मालकी हक्क कागदपत्रे, ३) थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ३ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १.विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ४ | तात्पुरते/कायम स्वरुपी नळ जोडणी खंडीत करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ५ | पुन्हा नळजोडणी करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.भोगवटा प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ६ | वापरामध्ये बदल करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ७ | पाणी देयक तयार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ८ | प्लंबर परवाना | १ विहित नमुन्यातील अर्ज २.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ९ | प्लंबर परवाना नूतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज २.शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र ३.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |

### - पाणी पुरवठा -

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | थकबाकी नसल्याचा दाखला | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ११ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | पाणी पुरवठा अभियंता (नळ | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| १२ | अनाधिकृत नळ जोडणी प्रकार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | पाणी पुरवठा अभियंता (नळ संयोजन विभाग) | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| १३ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| १४ | पाणी गुणवत्ता तक्रार | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | पाणी पुरवठा अभियंता | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |

### - ना-हरकत प्रमाणपत्र -

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यापार/व्यवसाय/ साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र | योग्य प्रकारे भरलेला अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | ना हरकत विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| २ | मंडपासाठी ना हरकत प्रमाणपत्र | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.रस्ता पुनर्स्थापना करार | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | ना हरकत विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |

### - व्यवसाय परवाना -

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवीन परवाना मिळणे | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| २ | परवान्याचे नुतनीकरण | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ३ | परवाना हस्तांतरण | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ४ | परवाना दुय्यम प्रत | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ५ | व्यवसायाचे नाव बदलणे | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ६ | व्यवसाय बदलणे | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ७ | परवाना/धारक भागीदाराचे नाव बदलणे | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ८ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ९ | परवाना रद्द करणे | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| १० | कालबाह्य परवानासाठी नुतकीकरण सुचना | १.योग्य प्रकारे भरलेला अर्ज २.कोणतेही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |

### शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवी-१४ दिनांक-२३/०६/२०१५ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | जन्म प्रमाणपत्र निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | मृत्यू प्रमाणपत्र निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज २.वास्तव्याचा पुरावा ३.वयाचा पुरावा ४.विवाहित उपस्थित साक्षीदाराचे स्वयंघोषणा पत्र ५. ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र निर्गमीत करणारे विभाग प्रमुख | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा. ३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | सहाय्यक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २.७/१२ उतारा सिटी सर्व्हे उतारा. ३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ | सहाय्यक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | बांधकाम परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २. वास्तुविशारदाचा दाखला ३. मालकी हक्काची कागदपत्रे ४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती. ५. मोजणी नकाशा ६. मंजूर रेखांकणाची प्रत | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० | सहाय्यक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |

(पान ३ वर पहा..)

(पान २ वरून)

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | जोते प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | सहाय्यक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३.जोते प्रमाणपत्र<br>४.घरमालक/वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० | सहाय्यक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | जलनि:सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी प्रमाणपत्र<br>३.थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | कनिष्ट अभियंता | **उप-मुख्याधिकारी** कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.थकबाकी नसल्याचा दाखला<br>३.वास्तु शिल्पकार यांचा अर्ज<br>४.आग प्रतिबंधक उपाय योजना बाबतची रुपरेषा | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | सहाय्यक अग्निशमन अधिकारी | **मुख्य-अग्निशमन अधिकारी/ उपअग्निशमन अधिकारी** | मुख्याधिकारी |
| ११ | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.थकबाकी नसल्याचा दाखला<br>३.वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४.अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>५.लायसन्स एजन्सी यांचे नमुना-अ प्रमाणपत्र<br>६.विकासक/सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | सहाय्यक अग्निशमन अधिकारी | **मुख्य-अग्निशमन अधिकारी/ उपअग्निशमन अधिकारी** | मुख्याधिकारी |

**शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१८०/नवी-२० दिनांक-२९/०१/२०२१ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा**

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपीलिय प्राधिकारी | द्वितीय अपीलिय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जाहिरात परवाना/ आकाश चिन्ह परवाना (Signange License) नवीन परवाना व नुतनीकरण | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमित करणारे विभाग प्रमुख/लिपिक | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| २ | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie Shooting License) नवीन परवाना व नुतनीकरण | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमित करणारे विभाग प्रमुख/लिपिक | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ३ | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण (Auto renewal of trade License) | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ | परवाना निर्गमित करणारे विभाग प्रमुख/लिपिक | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ४ | प्रादेशिक योजनेचे (संपूर्ण तथा भाग नकाशे) पुरविणे अ.कृष्णधवल ब.रंगीत | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | सहायक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |
| ५ | विक्री-अ.विकास नियंत्रण नियमावली ब.प्रादेशिक योजनेची सीडी | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित न.प.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ | सहायक नगर रचनाकार | **उप-मुख्याधिकारी** | मुख्याधिकारी |

**उपरोक्त प्रमाणे अधिसुचित करण्यात आलेल्या सेवा नागरिकांना दिनांक ०१/०४/२०२५ पासून केवळ ऑनलाईन पध्दतीने देण्यात याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा. लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ मधील खालील अधिसूचित केलेल्या सेवा देण्याबाबत दिरंगाई अथवा टाळाटाळ दिसून आल्यास संबंधित विभाग प्रमुखावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

स्वाक्षरीत/-

**(श्रीमती प्रियंका टोंगे)**

**मुख्याधिकारी**

**नगर परिषद, अंबाजोगाई, जि.बीड.**

# सायबर गुन्ह्यांमध्ये उकल होण्याच्या टक्केवारीत वाढ
# हेल्पलाईन क्र.१९३० वर संपर्क साधण्याचे आवाहन



मुंबई : माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत सायबर गुन्ह्यांची उकल होण्याची टक्केवारी २२ टक्के होती. ती वर्षाअखेर म्हणजेच माहे डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत २५ टक्के इतकी झाली आहे. ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये ६१३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून ६८३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हे उकल होण्याची टक्केवारी १९ टक्के इतकी आहे. माहे डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत ७५३ गुन्हे उघडकीस आणले व ७४८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हे उकल होण्याची ही टक्केवारी २२ टक्के इतकी आहे. यावरून सायबर गुन्ह्यांमध्ये उकल होण्याच टक्केवारीत वाढ झालेली दिसून येते.

एखादा सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे, केंद्र शासनाचे सायबर गुन्ह्यांच्या तक्रारीचे पोर्टल व हेल्पलाईन क्रमांक १९३० येथे संपर्क साधून तात्काळ माहिती देण्यात यावी अथवा तक्रार करावी, असे आवाहनही पोलीसांकडून करण्यात येत आहे.

नोंद झालेल्या जास्तीत जास्त सायबर गुन्ह्यांची उकल करण्याच्या दृष्टीने पोलीस सतत प्रयत्नशील असतात. जास्तीत जास्त सायबर गुन्हे उघडकीस येण्याकरीता सायबर विभागात काम करणारे अधिकारी व अंमलदार यांना तांत्रिक तपासाचे वेळोवेळी अद्ययावत प्रशिक्षण देण्यात येते. सायबर गुन्ह्यांची उकल होण्याच्या टक्केवारीत वाढ झालेली आहे. सायबर गुन्हे रोखण्याकरीता दैनंदिन स्तरावर पोलीस ठाणे हद्दीत घेण्यात येणाऱ्या नागरिकांच्या कॉर्नर मिटींग, सोसायटी मिटींग, जेष्ठ नागरिकांचे क्लब, झोपडपट्ट्या तसेच शाळा, महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी व त्याची कार्यपद्धती, सुरक्षा विषयक उपाय योजनांची माहिती देण्यात येत आहे. कोणत्याही आमिषाला बळी न पडता फसवणूक करणाऱ्या ॲपपासून सावधानता बाळगण्याचे आवाहनही पोलीसांकडून करण्यात येत आहे.

मोहल्ला समित्या तसेच इतर जनतेच्या बैठकांमध्ये सायबर गुन्ह्यांची माहिती देवून वेळोवेळी चालणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या ट्रेंडविषयी जनजागृती करण्यात येत आहे. अनोळखी व्यक्ती कडून सोशल मीडियावर 'फ्रेन्ड रिक्वेस्ट' स्वीकारू नये व त्याला कोणताही प्रतिसाद देवू नये. शाळा व महाविद्यालयाच्या सभेमध्ये आणि निर्भया पथकाच्या बैठकांमध्ये देखील अनोळखी व्यक्तींच्या 'फ्रेंड रिक्वेस्ट' व प्रतिसाद न देण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. हॅशटॅग **Thodasasochale** अन्वये सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्वतः पुढाकार घेऊन तयार केलेल्या व्हिडीओ/चित्रफित इंस्टाग्राम, ट्विटर, व्हॉट्सप व युट्यूबमार्फत प्रसारित करण्यात आल्या आहेत, असे सायबर गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त यांनी कळविले आहे.

## आकाशातून पडलेल्या....(पान १ वरून)

भेट देत पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे भूवैज्ञानिक शास्त्रज्ञांच्या टीमने पाहणी केली. अभ्यासकांनी दगडाची पाहणी केल्यानंतर ८० सेंटीमीटर आकाराचे हे दगड उल्कापिंड असल्याचे सांगितले आहे. खगोल अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी हा सगळा आशनीपाताचा प्रकार असावा असे म्हटले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्राचे अभ्यासक श्रीनिवास औंधकर, अभिनव विटेकर यांच्या टीमने पाहणी केली होती. तेव्हा हा आवाज कशामुळे झाला? दगड पडण्याचे कारण काय? याचे गूढ काय ते लवकरच कळवू, अशी माहिती शास्त्रज्ञांनी दिली होती. दोन दगड पडले असून यातील एक दगड तहसीलदाराकडून घेतला आहे, तर दूसरा एक दगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवणार असल्याचे सांगितले होते. गावातील भिकाजी अंबुरे यांच्या घरावर एक दगड पडला होता. हा दगड इतक्या वेगाने पडला की घरावरील पत्रा तुटून दगड थेट घरात पडला होता. तर इतर दोन दगड हे शेतात पडले, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली होती. हा दगड पडताना इथे खेळणाऱ्या मुलांनी पाहिले होते. जेव्हा शास्त्रज्ञांची टीम पाहणी करण्यासाठी आली होती तेव्हा अधिकाऱ्यांना व शास्त्रज्ञांना दगड कसा पडला हे सांगताना येथील मुलांच्या चेहऱ्यावर प्रचंड उत्साह दिसून आला. या घटनेमुळे काही काळ नागरिक भयभीत झाले होते.

## धनंजय मुंडे यांच्या..... (पान १ वरून)

धनंजय मुंडे दोघांनी एकमेकांना निवडून येण्यासाठी मदत केल्याने परळीतील धनंजय मुंडे यांच्या वर्चस्वाला तूर्त तरी फार मोठे आव्हान नाही. मात्र, राज्याच्या राजकारणात 'ओबीसी' चेहरा म्हणून पुढे जाण्याची संधी मिळण्यावर मात्र प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**बीडच्या राजकारणात संधी कोणाला ?**

जिल्हा वार्षिक आराखड्याची बैठक पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संयुक्तपणे घेतली. तत्पूर्वी अजित पवार यांनी अधिकाऱ्यांशी स्वतंत्र चर्चा केली होती. पत्रकारांशी सामोरे जाताना अजित पवार यांच्या बाजूला धनंजय मुंडे होते. पण संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर धनंजय मुंडे काहीसे मागे फेकले गेले. राजीनाम्यानंतर बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे यांचे नेतृत्व प्रशासकीय पातळीवर राहील असे चित्र दिसून येत आहे. सर्वसाधारणपणे पोलीस ठाण्यातील वाद सोडविण्यासाठी नेत्यांनी फोन करावा अशी बीड जिल्ह्यातील रूढ पद्धत आहे. असे फोन पंकजा मुंडे करत नाहीत, ही चांगली बाब. त्यांचे कार्यकर्ते मात्र या त्यांच्या चांगल्या गुणांचे कौतुक करण्याऐवजी त्याची तक्रार करतात, निधी वाटपात यापुढे अजित पवार यांचे लक्ष असल्याने त्यात प्रत्येक मतदारसंघात समतोल राखला जाईल असे मानले जाते.

**अजितदादांच्या भूमिकेकडे लक्ष**

प्रशासनावर वचक असणारा नेता अशी अजित पवार यांची ओळख आहे. मात्र, राजकीय बळ देताना त्यांच्याकडूनही अनेकदा चुका घडल्या असल्याने बीडच्या राजकारणात नवे बदल करताना ते एका बाजूला झुकणार नाहीत, आणि नव्या नेतृत्वालाही संधी देतील का, याची उत्सुकता राजकीय वर्तुळामध्ये आहे. गेल्या काही दिवसात बीडचे पोलीस अधीक्षक बदलल्यापासून प्रशासकीय पातळीवर काही नवे बदल दिसू लागले आहेत. जातीय सलोखा रहावा म्हणून नवनीत कॉवत या पोलीस अधिकाऱ्याने अडनावांनी हाका मारण्याची पद्धत बंद केली. तक्रार करण्यासाठी आता जलद प्रतिसाद संकेतांक अर्थात क्यूआर कोड उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे आता पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवून घेण्याचे प्रमाण वाढते आहे. प्रशासनात केल्या जाणाऱ्या बदलांना नेत्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला तरी बीड जिल्ह्यात काही नवे घडू शकेल, असे सांगण्यात येते.

## पाण्याची टाकी शोभेला...(पान १ वरून)

परंतु माजलगाव बस स्थानकात प्रवाशांना पिण्याचे पाणी मिळत नसल्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांवर विकतचे पाणी घेण्याची वेळ येत अहे. आगारात पाणी नसल्यामुळे स्थानकातील स्टॉलधारक तसेच हॉकर्स कुलिंगच्या नावाखाली एका बाटलीमागे पाच रुपये जास्त वसूल करत असल्याच्या तक्रारी आहेत.

पाणी बाटली विकणाऱ्यां सोबत आगार प्रमुखाचे साटेलोटे आहेत काय ? असा सवाल करीत बस स्थानकात पिण्याच्या पाण्याची सोय करावी अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

● बस स्थानकाच्या आवारात बसवलेले वॉटर फिल्टरसाठी त्यावरील टाकीमध्ये सोडण्यासाठी आम्ही टँकरने विकत पाणी आणतो. ते पाणी सोडत असतो.

**-सुहास कोळपकर,**
आगार प्रमुख माजलगाव.

**प्रवास फुकट पाणी विकत**

● सध्या महिलांना प्रवासामध्ये पन्नास टक्के सवलत असून ७५ वर्षाच्या वृध्दांना मोफत प्रवास आहे.

परंतु या ठिकाणी सुविधा नसल्यामुळे त्यांना पाणी विकत घेण्याची वेळ येऊ लागली आहे. त्यामुळे प्रवास फुकट व पाणी विकत अशी म्हणण्याची वेळ वृध्दांवर आली आहे.

## वार्ता समुहाच्या वतीने....(पान १ वरून)

कारखाना ते स्वतः चालवत आहेत. उद्योजक म्हणून त्यांना संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाते. तसेच सतीश बनसोडे यांना सद्भावना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.सतीश बनसोडे हे अंबाजोगाईचे भूमिपुत्र असून ते सेलू जि.परभणी येथे दुय्यम निबंधक वर्ग २ या पदावर कार्यरत आहेत. अंबाजोगाई व परिसरात त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले आहे. विविध चळवळीशी ते एकरूप झालेले आहेत तर युवा गौरव पुरस्कार हा अंबाजोगाई येथील युवा उद्योजक व हॉटेल साई पॅलेस चे मालक सुजितसिंह उदयसिंह दिख्खत (ठाकूर) यांना जाहीर करण्यात आला आहे. सुजित दिख्खत (ठाकूर) हे हॉटेल व्यवसाय आणि कन्स्ट्रक्शन व्यवसायातील यशस्वी उद्योजक आहेत. त्यासोबतच सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरीव असे कार्य आहे. या पुरस्काराचे वितरण शनिवार दि. १५ मार्च रोजी सायं. ५.३० , वा.अंबाजोगाई येथील श्री मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, नगरपरिषद अंबाजोगाई या ठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमात जगविख्यात उद्योजक व 'ल्युमिनियम मॅन' म्हणून ओळख असलेले व टोरल इंडिया कंपनीचे मुख्य प्रवर्तक इंजि. भरत केशवराव गित्ते यांच्या यांच्या हस्ते मान्यवरांचा जाहीर सत्कार होणार आहे .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाने अंबाजोगाई पीपल्स बँकेचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, परभणी येथील जायकवाडी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब, केजच्या नगराध्यक्ष.सौ सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हरूनभाई इनामदार,अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी, अंबाजोगाई येथील उद्योजक प्रतापराव पवार, आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, पुणे येथील प्रसिद्ध डॉ. सचिन नागापूरकर, परळी येथील सामाजिक कार्यकर्ते राजेभाऊ फड, प्रा.ईश्वर मुंडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे. याच कार्यक्रमात एमपीएसडी परीक्षेत उत्तीर्ण झालेले इंजी.श्रीनाथ गीते व इंजी .सुमित राजाभाऊ लोमटे यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे. तरी या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते ,अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, तालुका पत्रकार संघ तालुका अंबाजोगाई, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा अंबाजोगाई, अ .भा. म .पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई, गुड मॉर्निंग ग्रुप अंबाजोगाई, अ.भा.म. प. डिजिटल मीडिया शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.तरी या कार्यक्रमास बहुसंख्य नागरिक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

## सिंदफणा स्कूलमध्ये.

दर्शवणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. कार्यक्रमासाठी प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी मराठी विभाग प्रमुख ज्योती जोशी, सर्व शिक्षक व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आदर आणि प्रेम वाढीस लागेल असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला.

# पवित्र पोर्टलच्या माध्यमातून कोणतीही चुकीची भरती नाही-मंत्री दादाजी भुसे

मुंबई : पवित्र पोर्टलच्या माध्यमातून कोणतीही चुकीची भरती झाली नसल्याचे स्पष्टीकरण शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत दिले. सदस्य इद्रिस नायकवडी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी यांनी सहभाग घेतला.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून गुणवत्तेवर अधारित शिक्षकांची भरती होत असल्याचे सांगून शालेय



शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले की, सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये भाषा विषय शिकवणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करताना त्यांचे व्यावसायिक शिक्षण म्हणजेच डीएड, बीएड हे त्याच भाषेत झाले असल्यासच नियुक्ती देण्यात येते. तसेच पवित्र पोर्टल टप्पा दोनमध्ये नियुक्त केलेल्या शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी चांगला संवाद निर्माण व्हावा यासाठी त्याच माध्यमातून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात येत आहे. यामुळे सर्वच विषयांमध्ये शिक्षण घेताना विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये सुसंवाद प्रस्थापित होऊन दर्जेदार शिक्षण देता येईल. यासाठी उमेदवाराचे इ.१० वीचे माध्यम विचारात घेतले जाणार (पान ४ वर)